# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : १३/११/२०१८

**आलोसे योगेश शंकर लोंढे पोलीस शिपाई, ब.नं.२५२२, नेमणुक मुंबईनाका पोलीस ठाणे नाशिक शहर यांना ५,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांचे मित्राविरुध्द मुंबईनाका पोलीस ठाणे नाशिक शहर येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात तक्रारदार यांचे नांव न घेण्यासाठी व त्याला वाचविण्यासाठी आलोसे योगेश शंकर लोंढे पोलीस शिपाई ब.नं.२५२२, नेमणुक मुंबईनाका पोलीस ठाणे नाशिक शहर यांनी तक्रारदार यांचेकडे आज दि.१३.११.२०१८ रोजी १५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक १३/११/२०१८ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे योगेश शंकर लोंढे पोलीस शिपाई, ब.नं. २५२२ नेमणुक मुंबईनाका पोलीस ठाणे नाशिक शहर यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कमेपैकी ५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन ती मुंबईनाका पोलीस ठाणे नाशिक शहर समोरील आवारात स्विकारली असता आलोसे यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅंडलाईन व मोबाईल ते लॅंडलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

( विश्वजीत जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता